


(वर्ष ९४) पौष ते माघ शके १९४३ - जानेवारी ते मार्च २०२२ (संयुक्तांक १ ते ३)

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ५ |
| ३) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | १९ |
| ४) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २६ |
| ५) | विशेष सूचना | ३१ |
| ६) | महत्वाच्या सूचना | ३२ |
| ७) | विनंती | ३३ |
| ८) | निवेदन | ३४ |
| ९) | अमृतकण | ३६ |
| १०) | सद्भक्तांना आवाहन | ३८ |
| ११) | मंगलाचरण | ४० |
| १२) | शोकवृत्त | ४२/४३ |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।



## - संपादकाचे बोल -

## (वर्ष ९४) आश्विन ते मार्गशीर्ष (शके १९४३) (संयुक्तांक ४ ते ६) (ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०२१) मासांतील कार्यक्रमाचा गोषवारा

सद्भक्ति प्रकाशचा ९४वा अंक एका नवीन आशेने वाचकांपुढे सादर करीत आहोत. टाळेबंदी हळूहळू शीतल होत आहे व सद्भक्ति प्रकाशची शतकाकडे आगेकूच खूप उत्साहाने चालू आहे. सद्गुरुंनी सर्व संकटाचे निवारण करून आम्हां बालकांना सुखरूप ठेवावे व नव्या जोमाने कार्य करण्यास प्रेरणा द्यावी हीच त्यांच्या चरणी कळकळीची विनंती आहे.

शनिवार दि. २.१०.२०२१ (भाद्रपद वद्य एकादशीला) श्री बलभीम महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

गुरुवार दि. ७.१०.२०२१ (आश्विन शुद्ध प्रतिपदा) रोजी घटस्थापना होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. प्रतिपदा ते नवमीपर्यंत सायंकाळी ५ वाजता नवरात्रौपासना, दुर्गास्तोत्र व 'कलौचंडी विनायकौ'चे वाचन ठराविक सद्भक्तांनी केले.

गुरुवार दि. १४.१०.२०२१ (आश्विन शुद्ध नवमीला) रामेश्वर मंदिरात सद्भक्ति प्रसारक मंडळींतर्फे रंगपूजा व आरती प्रसाद झाला.

शुक्रवार दि. १५.१०.२०२१ रोजी विजया दशमी - दसरा होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली व एकादशणी पण त्याचवेळी गाभाऱ्यांत संपन्न झाली व ठराविक पदे म्हणण्यात आली. त्याच दिवशी सद्भक्ति प्रसारक मंडळींचा वर्धापन दिन होता. सायंकाळी ६ वाजता पालखी मिरवणूक संपन्न झाली व यावेळी ही पालखी दोन्ही सोसायट्यांमधून (सारस्वत कॉलनी व हिंदू फ्रेन्ड्स सोसायटी) मिरवणूक निघाली.

## गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथ्योत्सव

मंगळवार दि. १९.१०.२०२१ (आश्विन पौर्णिमा - कोजागिरी पौर्णिमा) सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ७ वाजता बाळमंडळातर्फे श्रीकृष्ण भक्तिपर पदें व रासलिलेची पदें म्हणण्यात आली.

शनिवार दि. २३.१०.२०२१ (आश्विनवद्य तृतीया) या दिवशी गुरुवर्य श्री भाईंची व श्री बाळेकुंद्री महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. नंतर गाभाऱ्यातच एकादशणी करण्यात आली व ठराविक पदे म्हणण्यात आली व यंदा श्री सद्गुरु कृपेने शेजोत्सवही संपन्न झाला.

रविवार दि. २४.१०.२०२१ रोजी सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तनपण करण्यात आले.

मंगळवार दि. २.११.२०२१ (आश्विन कृष्ण द्वादशी) गुरुद्वादशीला सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. त्याचवेळी गाभाऱ्यात एकादशणी करण्यात आली व इतर पदें म्हणण्यात आली. रात्रौ ८.३० वाजता

पालखी मिरवणूक संपन्न झाली.

गुरुवार दि. ४.११.२०२१(आश्विन कृष्ण चतुर्दशी) नरक चतुर्दशीला प्रात:स्मरणवेळी स्तवन व प्रार्थना केली गेली. सकाळी १० वाजता श्री रामेश्वर मंदिरात 'उद्धव-गोपी' गीत व सामुदायिक भजन म्हणण्यात आले.

शुक्रवार दि. ५.११.२०२१ (कार्तिकशुद्ध प्रतिपदा) बलि प्रतिपदा होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली व सकाळीच सुखासनानिमित्त झालेले सद्गुरु दादाभाईंचे प्रवचन व एकादशणी झाली व इतर पदें म्हणण्यात आली.

सोमवार दि. १५.११.२०२१ (कार्तिक शुद्ध एकादशी) प्रबोधिनी एकादशी होती. सायंकाळी ५.३० वाजात 'पंढरीचा प्रसादमेवा' या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन झाले.

गुरुवार दि. १८.११.२०२१ (कार्तिक शुद्ध चतुर्दशी) वैकुंठ चतुर्दशीला गुरुवर्य श्री भाईंचा अस्थि विसर्जन दिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली व सकाळीच गाभाऱ्यात एकादशणी केली गेली व त्यावेळी पदें पण म्हणण्यात आली. रात्रौ ८.३० वाजता कमळे वाहण्याचा कार्यक्रम पण झाला.

शुक्रवार दि. १९.११.२०२१ (कार्तिकी पौर्णिमा) त्रिपुरारी पौर्णिमा श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक संपन्न झाली.

शनिवार दि. २७.११.२०२१ (कार्तिक कृष्ण सप्तमी) रोजी श्री काळभैरव जयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना केली गेली.

गुरुवार दि. २.१२.२०२१ (कार्तिक कृष्ण त्रयोथोदशीला) श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी होती. प्रात:स्मरणाचेवेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

सोमवार दि. १३.१२.२०२१ रोजी (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराज पादुका स्थापनादिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना व त्याचवेळी एकादशणी गाभाऱ्यात करण्यात आली व (१) माझी देवपूजा व देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व प्रार्थना म्हणण्यात आली.

मंगळवार दि. १४.१२.२०२१ला (मोक्षदा एकादशी) श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभू महाराज पुण्यतिथी होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. सकाळी १० वाजता सामुदायिक गीता पठण झाले.

शनिवार दि. १८.१२.२०२१ (मार्गशीर्ष पौर्णिमा) होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन, प्रार्थना व गाभाऱ्यात एकादशणी करण्यात आली त्यावेळी (१) माझी देवपूजा देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) श्री गुरुदत्ता, दयासागरा प्रभो (४) दत्तासि गाईन, दत्तासि पाहीन (५) दत्त माझी माता, दत्त माझा पिता (६) बोल बोल बोल दत्ता बोल. ऐक बाळ रे। बोले तुझ्या वृत्तिसुखे प्रेमस्वरुपी डोळ रे (७) दत्त गुरुराज, दत्त महाराज। दत्त योगीराज स्मृतुगामी (८) भवतारक ह्या तुझ्या पादुका। वंदीन मी माथा। करावी कृपा गुरुनाथा।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

सायंकाळी ६ वाजता दत्तजन्मोत्सव संपन्न झाला. त्यापूर्वी (१) दत्तात्रेया गुरुणो विंदा। दत्त जयजय परमानंद।। (२) हा परम सनातन विश्व भरूनि उरला। गुरु दत्तराज ऋषि कुळांत अवतरला।। त्यानंतर 'बाळा जो जो रे। कुलभूषणा। श्री अत्रिनंदना (३) गुण धरूनि हालविते जो। मुनिमानस रंजन जो जो। हा पाळणा म्हणण्यात आला. त्यानंतर (१) शांत किती ही सद्गुरुमूर्ति। पाहतां मावळे द्वैतवृत्ति।। (२) साष्टांग प्रणिपात तया माझा रे (३) ब्रम्हयाचा स्वपिता (३) दत्त गुरुराज, दत्त महाराज। दत्त योगीराज स्मर्तृगामी ही प्रार्थना म्हणण्यात आली. यावर्षी टाळे बंदी शिथील झाल्यामुळे जन्मोत्सवासाठी बराच भक्तसमुदाय जमला होता. रात्रौ ८.३० वाजता पालखी, मिरवणूक निघाली.'

मंगळवार दि. २१.१२.२०२१ रोजी सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले व ठराविक सद्भक्तांनी भक्तीपूर्ण व सुमधुर पदें म्हटली.

शनिवार दि. २५.१२.२०२१ श्री मोरया गोसावी पुण्यतिथी दिन व श्री येशू ख्रिस्त जयंती दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना म्हणण्यात आली.

बुधवार दि. २९.१२.२०२१ला श्री रंगनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना केली गेली.

**: इति :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

**५.४.१९३१**

**“जयदेव, जयदेव, ॐकारा, गणराया । जय सद्गुरु राया ।।**
**आरती ओवाळूं तुज विघ्यें हराया...।।”**

काही दिवसांमागे ह्या आरतीवर विवेचन झाले होते, त्यावेळी आपण “धर्म, अर्थ, काम मोक्ष” ह्या चरणापर्यंत आपण आलो होतो. व्यवहारात धर्म म्हणजे वेदविहित कर्मे करणे, अर्थ म्हणजे द्रव्य संपादन करणे, काम म्हणजे लग्न करून प्रपंच करणे, व मोक्ष म्हणजे मुक्ती साध्य करणे असा लोक अर्थ करितात. पण हा अर्थ अगदी चुकीचा आहे. ह्याचा खरा पारमार्थिक अर्थ अगदीच निराळा आहे. मोक्ष संपादन करणे हे वेदांचे ध्येय आहे. असे असून ज्याप्रमाणे ज्याला उत्तरेला जावयाचे आहे, तो जर दक्षिणेला जाऊ लागला तर तो उत्तरेला जाऊन पोहोचणार नाही, त्याप्रमाणे मोक्ष प्राप्तीचा खरा मार्ग सोडून जर एखादा भलत्याच मार्गाने जाऊ लागला, तर त्याला मोक्ष कसा प्राप्त होईल? तेव्हा नरजन्माचे ध्येय जे मोक्ष ते गाठण्याला श्रुति जे साधन सांगते, ते हे की :- **“न कर्मणा न प्रजया न धनेन त्यागेनैकेअमृतत्त्व मानशुः।।”** श्रुति स्पष्ट सांगते की कर्मे

करून मोक्ष प्राप्ती कधीच होणार नाही. तेव्हा "धर्म" ह्या शब्दाचा व्यवहारांत वेदविहित कर्मे करणे असा जो अर्थ करितात, तो चुकीचा आहे, हे उघड आहे. तसेच "न प्रजया" लग्न करून प्रपंच विस्तार करून मोक्ष कसा मिळणार ? नाथ म्हणतात की स्त्री तर ह्या गुणमयी मायेचे व्यक्त स्वरूप आहे :-

**"दैवी गुणमयी जे माया । तिचें सगुण रुप त्या स्त्रिया ।**

**तेथें अलोभ उपजला प्राणिया। भोग भोगावया स्त्री सुखें ।।"**

भगवान् ही गीतेंत म्हणतात :-

**"दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।।" (भ.गी. ७/१४)**

तेव्हा लग्न करून प्रापंचिक सुखांत निमग्न झाल्यावर मोक्ष प्राप्तीचा विचार कोठून सुचणार व तो कसा प्राप्त होणार ? तेव्हा **"मोक्ष नव्हे कर्में धनें। मोक्ष नव्हे पुत्र संतानें।।"** हाच सिद्धांत खरा मानला पहिजे.

आता त्यामागे मोक्ष कसा प्राप्त होतो ह्याचा आपण विचार करू. त्याग ह्या शब्दांतच 'धर्म' ह्याचा समावेश होतो. ह्याचा स्पष्टार्थ असा की निष्काम कर्म करून ते ईश्वरार्पण केल्यानेच अमृत म्हणजे मोक्ष प्राप्त होतो. ईश्वरार्पण करणे म्हणजे :- **"मी एकु कर्म कर्ता। ऐसी उठो नेदी अहंता। तें कर्मची स्वभावतां। अर्पी श्री ईश्वरा अनंतातें।।"** याचेंच नाव भगवद्दास्य :- **"दास्याचें माझ्या हेंचि वर्म। कीं मज अर्पी सर्व कर्म। मुख्य प्रथम भागवत धर्म। या नाव।।"** देहाच्या संपूर्ण क्रिया प्रारब्धानुसार पूर्व प्रवाहाने आपोआप होत असतात, आणि आपण त्या साक्षीरूपाने फक्त पाहतो. **"निर्हेतुक निरहंकारें। ब्रह्मार्पण सहजिची होतो।।"** अशा रीतीनें जर आपण सर्व कर्में केली, तर धर्माचे योग्य आचरण होऊन अंत:करण शुद्धि झाल्यावर ज्ञान प्राप्त होईल आणि शेवटी मोक्षाला जाता येईल. "ज्ञानादेवतु कैवल्यम्" असे श्रुति म्हणते. तेव्हा धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे पुरुषार्थ वर सांगितले, त्यापैकी 'अर्थ' ह्याचा अर्थ ज्ञान असा आहे. येथें त्याचा धन, द्रव्य असा अर्थ करणे चुकीचे आहे. विषय सुखाकरिता प्रपंचांत पडणे ह्यापासून फार अनर्थ होतो. श्रीबाबा म्हणतात:- **"विषयसंगे बुद्धि माझी विसरली तुला। हेंचि अनर्थासि मूळ झालें की मला।।"** हा सर्व अनर्थ देह

संगामुळे उद्‌भवतो. म्हणून श्रीबाबा म्हणतात :- “**नको नको मज देहसंग देऊं माधवा।।**” ह्या देह संगासारखा दुष्ट संगच नाही :- “**मुख्य असत्संग देहसंगती। त्याची करावी समूळ निवृत्ती।।**” गुराखी आपल्या गुरांबरोबर गवत खात नाही हे म्हणणे विपरीत दिसते. पण आमची स्थिती गुराख्याने गवत खाण्यासारखीच झालेली आहे. ह्या स्थितीतून मुक्त होण्यास एकच उपाय आहे की गुरुपासून अर्थ म्हणजे ज्ञान संपादन करून घ्यावे :- “**गुरूपासूनि घ्यावे ज्ञान। मग तो ईश्वर म्हणोनि त्याचे भजन। त्या भजने बाणतसे समाधान। जे उपदेशिले ते ज्ञानची बिंबते श्रुति म्हणे।।**” वामन पंडित म्हणतात की मी हे आपल्या पदरचे सांगत नाही, तर ह्याला श्रुतीचे प्रमाण आहे. ती श्रुति अशी आहे :- “**यस्य देवे पराभक्ती यर्था देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्था प्रकाशंते महात्मन:।।**”

ज्ञान संपादन केल्यावर त्याचे जतन केले पाहिजे. ते जतन करण्याला गुरुदेव भक्ती करणे हाच एक उपाय आहे. ईश्वरावर आणि गुरुवर आत्मभावाने प्रीति करणे ह्यालाच खरा ‘काम’ म्हणतात. तीच खरी भक्ती :- “**परि प्रीति जे आत्म स्वभावे। तये प्रीतीला भक्ती ऐसें म्हणावें।।**” कारण “True God is a jealous God.” म्हणजे “ईश्वराला द्वैत रीतीनें आपली भक्ती केलेली आवडत नाही.” तसेच भगवान गीतेंत म्हणतात :- “**मां च योऽव्यभिचारेण भक्ती योगेन सेवते। स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।**” (भ.गी. १४/२६) अशा खऱ्या भक्तीला काम म्हणतात :- “**काम असावा ईश्वर भजनी।।**” व्यवहारात जो काम म्हणून समजतात, तो सर्व अनर्थाचे मूळ आहे. परंतु अव्यभिचारी भक्तियोगाने भक्त :- “**ब्रह्म भूयाय कल्पते।।**” सगुण ब्रह्म होण्यास योग्य होतो, अर्थात देह पडल्यावर :- “**पडे देह तो त्याची देही मुकुंदा। हरि ने स्ववैकुंठ लोकांसि तेव्हा।।**”, भगवान आपल्या भक्तास वैकुंठास घेऊन जातो :- “**माझें स्थान वैकुंठ जाण। तेथील प्राप्ती सायुज्य सगुण। ब्रह्म परिपूर्ण सदोदीत।।**” वैकुंठवासी भक्त तेथे जो आनंद भोगतात त्याचे वर्णन नामसुधेंत केले आहे ते असे :- “**अमृत होऊनि ही रसना मिसें। अमृत सेविति भाग्य पहा कसें।।**” म्हणून स्वामी विवेकानंद म्हणतात :- “I want

to test sugar, I do not want to become sugar", म्हणजे मला साखरेची गोडी घ्यावयास पाहिजे. नुसती साखर होण्यात अर्थ नाही. "to become sugar" साखर होणे म्हणजे द्राष्टांतांत सायुज्यतेंत -निर्विकल्पांत मिळून जाणे :- **"अमृत केवळ होऊनि राहती। परि सुधा मधुरत्व न पाहती।।"** सायुज्यतेतं सत्त्व नसल्यामुळे दु:ख नाशाबरोबर सुखाचा ही अनुभव जातो. परंतु सगुण मोक्षांत सत्त्व गुण कायम असल्यामुळे तेथील सुखाचा अनुभव घेता येतो. म्हणून सगुण मोक्ष प्राप्त करून घेणे हाच पुरुषाचा परम पुरुषार्थ आहे :-

**"पुरुषाचा पुरुषार्थ हाचि। नि:शेष निवृत्ती होये दु:खाची।**
**आणि प्राप्ति निरतिशय सुखाची। व्यक्ती हेचि पुरुषार्था।।"**

सारांश ईश्वराची भक्ती करून सद्गुरुपासून ज्ञान-अर्थ-संपादन झाल्यावर पराभिक्त-गुरुदेव भक्ती (काम) अनन्य भक्तीच्या योगानें सगुण मोक्ष सायुज्य पूर्ण संपादन करणे हेच नर देहाचे अंतीम ध्येय आहे. गणपतीच्या चार भूजा धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ दर्शीवितात. त्याशिवाय त्याच्या प्रत्येक हस्तामध्ये एक एक आयुध आहे, त्याचा ही जो पारमार्थिक अर्थ आहे, त्याचा आपण आता विचार करू:

**"वरद हस्तांकुश परशुमोदक। आयुधांनी देसी वैकुंठ सुख।।"**

गणेशाच्या चार भुजा चार पुरुषार्थ दर्शीवितात असे वर सांगण्यात आले. परंतु हे चार पुरुषार्थ प्राप्त झाले म्हणजे कार्य आटोपले असे समजू नये. त्याचे रक्षण करणे हे ही तितक्याच महत्त्वाचे आहे. हा गणपती सद्गुरु हे चार पुरुषार्थ देऊन त्याचे रक्षण ही करितो, हे त्यांनी हातात धरलेल्या आयुधांनी दर्शीविले आहे. पहिले आयुध-वरदहस्त-सत्संगति आणि ईश्वराची कृपा दर्शीविते, कारण :- **"ईश्वरानुग्रहें सत्संगति।।"** ईश्वराच्या कृपेनेंच सत्संगति प्राप्त होते व सत्संगतींत श्रवण, कीर्तन करून चित्तशुद्धि झाल्यावर ज्ञान होते :- **"बिना सत संग विवेक न होई। राम कृपा बिन सुलभ न सोई।। "** सत्संगतींत श्रवण करीत असता मुमुक्षूला समजू लागते की आत्मा निष्क्रिय आहे व देहाच्या संपूर्ण क्रिया पूर्व कर्मानुसार प्रकृति कडून घडत असतात. असा बुद्धिचा निश्चय झाला की त्याची

सर्व कर्मे ईश्वरार्पण होऊं लागतात. याप्रमाणे तो सत्संगतींत भागवत धर्माचा ॐनामा शिकतो, शिवाय त्याची श्रवण कीर्तनादी भक्ती चालत असल्यामुळें ईश्वर त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याला आपले प्रेम म्हणजे शुद्ध सत्त्व गुण देऊन सद्गुरु रूपानें आत्मस्वरुपाचे अनुभवजन्य ज्ञान देतो :-

**"आत्मा न जाणत हि जे भजती मुकुंदा। त्याचा सदा करिता जे श्रवणादि धंदा।। त्यांना गुरु हरिच होऊनि अप्रयासें। होईल बोध परिपूर्ण वदेल ऐसें।।"** नुसते ज्ञान होऊन भागत नाही म्हणून गणेशाने सद्गुरुनें दुसऱ्या हातांत अंकुश धारण केला आहे. अंकुश हा प्रत्याहाराचें द्योतक चिन्ह आहे. हत्तीला नीट रस्त्यानें चालविण्यास ह्या हत्याराचा उपयोग करितात, तद्वत् परमार्थांत रजोगुणी हत्तीरुपी मन सद्गुरुनें विषयरुपी आडरानांतून काढून मोक्षाच्या राजमार्गावर आणून सोडिलें असताही ते पुन्हा पूर्व संस्काराच्या बळाने विषयरुपी रानांत शिरते, म्हणून सद्गुरु अंकुशरुपी प्रत्याहाराने ते विषयांतून काढून स्वरूपाकडे लावतो. तो हे कसे गोडीगुलाबीने व युक्तीने करितो, ह्याचा एक मासला येथे देतो :- **"तूं ये रे मना, सावध, सावध होई रे।। सावध तूं होसी जरि, परब्रह्मा नाहीं दूरी। पावशील आनंदा घरीं रे।।...।। सत्य नाहीं संसार, दोरावरी सर्पाकार। तैसें ब्रह्मी चराचर रे।।"** भक्ताचें मन विषयाकडे गेले की संतरुपी महात भक्तमन रुपीं हत्तीला प्रत्याहार रूपी अंकुशाने ताळ्यावर आणतो, आणि ते विषयातून काढून स्वरूपी योजितो :- **"विषय इंद्रियें जड ओळखणें हेंचि विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती फिरविणे या नाव भक्ती।।"**

गणेशाच्या तिसऱ्या हातात परशु म्हणजे कुऱ्हाड आहे. गुरुभक्ती हीच ही कुठार होय. हिच्या साहाय्याने तो संसार रुपी वन छेदून टाकतो.

**"एवं गुरुपासन भैव भक्त्या विद्याकुठारेण शितेन धीरः।**
**विवृश्चय जीवाशयमप्रमत्तः संपद्यचात्मन मथत्यजाऽस्तम।।"**

भववृक्षाचा छेद करण्यास गुरुभक्ती सारखी दुसरी कुठारच नाहीं :- **"न करितां सद्गुरुभजन। नव्हे भववृक्षाचें छेदन। जरी कोटि कोटि साधन। आने आन केलीया।। भववृक्षातें छेदिती। केवळ जाण गुरुभक्ती।।"**

म्हणून श्रृति म्हणते :- "**यस्य देवे पराभक्तीर्यथादेवे तथा गुरौ।।**" ह्या गुरुभक्तीच्याच सहाय्याने संचित क्रियमाण दुग्ध होऊन चित्तचैतन्य होईल. "**एवं बुद्धेः परं बुद्धवा संस्तभ्यात्मानमात्मना। जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम्।।**" (भ.गी. ३/४३)

गणपतीच्या चौथ्या हातात मोदक आहे, तो काय दर्शवितो हे आपण आता पाहू. गुरुदेव भक्ती कुठाराने द्वैतवन छेदून टाकल्यावर ज्ञानी भक्त सर्व चराचरांत एक परमात्मा पाहून होणाऱ्या आनंदांत सदा सर्वकाळ राहतो :- "**अंतरंगी तोचि जगीं पहात जा रे।।**" "**ब्राह्मणो मोदकं प्रियः।।**" अशी एक म्हण आहे, आणि "**ब्रह्म जानाति ब्राह्मण**" असेही म्हटले आहे. ह्या दोहोंची एक वाक्यता केली तर ह्या पारमार्थिक ब्राह्मणाला स्वरुपानंदारुपी मोदक, लाडू अति प्रिय आहे. तो त्याच्यासाठी इतका अधीर होतो की तो आपल्या सर्व इंद्रियांतून तो आनंद घेत असतो :- "**सुमनीं श्री हरि सुगंध। घ्राणीं तोचि जाणें गंधाव बोध। या परी सुमन मकरंद। भोगवी गोविंद निजांग योगें।। शीत उष्ण मृदू कठीण। स्पर्श प्रकाशिता नारायण। त्वचे माजीं तोचि स्पर्शन। या परि जगज्जीवन भोगवी स्पर्श।।**" या रितीने भक्त सर्व इंद्रियाद्वारा सविकल्प समाधीचे परमानंदाचे सुख अनुभवितो. त्याला निर्विकल्प समाधीचे सुख आवडत नाही इतकेच नाही तर त्याला सायुज्यता ही नको :- "**न लगे तो मोक्ष मज सायुज्यता। नावडे हे वार्ता शून्याकारी।।**" सारांश "**एवं चाले बोले उठे बैसे। परी अन्वय समाधी लागला असे। जड चैतन्य ऐक्य समरसे। मास त्या योग्याचे।।**" ह्या स्थितीत सदोदीत राहणाऱ्या भक्तांना शेवटी वैकुंठवास प्राप्त होतो तेव्हा श्री सद्गुरु गणरायाने आपल्या हातात जी आयुधे धरलेली आहेत, त्यांच्या योगे तो भक्तांना चारी पुरुषार्थ देऊन शेवटी वैकुंठाचे सुख ही देतो.

हा सगुणमोक्ष प्राप्तीचा साधन क्रम विषयासक्त मनुष्यांस झेपणार नाही म्हणून व्यासाचा शिष्य, जैमिनी ह्याने गुरुच्या आज्ञेने पूर्व मिमांसा म्हणजे कर्ममार्ग प्रतिपादन केला. त्यात त्याने सकाम लोकांच्या कल्याणाकरितां सकाम कर्माचे महत्त्व प्रतिपादन करून शेवटी ज्यांना मोक्ष प्राप्तीची इच्छा असेल, त्यांनी कर्मे

निष्काम बुद्धीने करून अद्वैत सिद्धांताची म्हणजे उत्तर मिमांसेचीच कास धरावी असा उपदेश केला.

उत्तर मिमांसा आणि पूर्व मिमांसा हे गणपतीचे दोन कर्ण आहेत :-

**“पूर्वोत्तर मिमांसा दोन्ही हे श्रवण।।”**

जैमिनीला अद्वैताचा पूर्ण अनुभव असून ही त्याने कार्यापुरते द्वैताला कर्मकांडाला हाती धरले. कर्मापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे हे त्यावेळी पुष्कळांना ठाऊक होते. म्हणून बहुजन समूहाचा कल ज्ञानामार्गाकडेच होता. परंतु ज्ञानाचे मुख्य पथ्य जी निष्कामता, ती अंगी नसल्यामुळे ज्ञान होणे ही मुळी अशक्यांतलीच गोष्ट होती. बरे, ज्ञानाला सकाम कर्म प्रतिकूल म्हणून त्यांनी त्यावेळी त्याग केला. त्यामुळे नुसते शाब्दिक ज्ञानाचे अवडंबर माजले. त्याचा परिणाम **“इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः।।”** अशी लोकांची स्थिती झाली. म्हणजे ज्ञान नसल्यामुळे ज्ञानाचे फळ, जो मोक्ष, त्याला ते अंतरले व सकाम कर्म न केल्यामुळे स्वर्गादि लोक प्राप्तीला ही ते मुकले. अशा लोकांना नरकवासा शिवाय गतीच नाही हे जाणून, व त्यांच्या नरक यताना चुकाव्या म्हणून व्यासाज्ञेने जैमिनीला आपल्या मताच्या विरुद्ध बतावणी करावी लागली :- **“वेद व्यास महामुनी। त्याचा शिष्य जैमिनी। कळत गुर्वाज्ञा म्हणोनि। भेद त्याने स्थापिला।।”** म्हणून गुरुद्रोहाचे पातक जैमिनीला लागले नाही. ह्या कामांत दोघांनी सिद्ध साधकपणा केला :- **“या कारणे महामुनी। स्वशिष्य ऋषि जैमिनी। त्यास सांगे वेमुनी। की प्रवर्तनी कर्म मार्ग।। न धरतां आमची भीड। मोक्ष फटकाळ ऐसी बडबड। करुनी काम्याचि गोड। वाटे ऐसें बोल तूं।।”** अशा रीतीने जैमिनीने लोकांना कर्म मार्गाची गोडी लावली. परंतु तेणे करून लोकांनी मोक्ष फळाला अंतरू नये म्हणून व्यासाने ‘उत्तर मिमांसा’ या नावाचा निराळाच ग्रंथ लिहिला, व त्याची अशी जुळणी केली की अनधिकारी म्हणजे सकाम लोकांनी काम्य कर्में करून स्वर्गादि लोक साधावेत. परंतु **“क्षीणे पुण्ये मर्त्य लोकं विशंति।।”** ह्या रहाट गाडग्यांतून त्यांची सुटका होणार नाही, म्हणजे जो लोक सद्भाग्यानें निष्काम असतील, त्यांनी निष्काम कर्में करून ती ईश्वरार्पण करावी आणि तेणें करून

होणाऱ्या अंत:करण शुद्धिद्वारा ज्ञान प्राप्त करून घ्यावे व शेवटी कैवल्य साधावा. सारांश 'पूर्व मिमांसा' व 'उत्तर मिमांसा' हे गणपतीचे दोन कर्ण आहेत. उत्तर मिमांसेची मजल फक्त सायुज्यते पर्यंत आहे. त्याही पुढे आपल्याला जावयाचे आहे. नुसते अन्वय ज्ञान बाणूनही भागत नाही. पुढचे कार्य साधण्यास सर्वात्म भक्ती झाली पाहिजे. गणपतीचा एकदंत तिचे द्योतक आहे :-

**"एकदंत ही दावी ब्रह्मैक्य पूर्ण।।"**

पूर्वोत्तर मिमांसा जाणणारे हजारों असतील, परंतु भक्तियुक्त ज्ञान जाणणारे विरळा :- "**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये। ययतामपि सिद्धांना कश्चिन्मां वेत्तितत्त्वत:।।**" (भ.गी. ७/३) म्हणून तुकाराम महाराजांनी म्हटले आहे :- "**भक्ति प्रेम सुख नेणवे आणिकां। पंडित वाचकां ज्ञानियांसी।। आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त। भक्ति प्रेम सुख दुर्लभ त्यां।।**" ह्या दोन चरणांनी उत्तर मिमांसेची खरी योग्यता ठरवून टाकल्यासारखीच आहे. ज्ञानी भक्ताला उत्कृष्ट दर्जाचें स्वात्मसुख इच्छामात्रे करून अनुभवितां येते :- "**युंजन्नेवं सदात्मानं योगी विघतकल्मष:। सुखेन ब्रह्म संस्पर्श मत्यंतं सुखमश्नुते।।**" (भ.गी. ६/२८) तरी देखील त्याला गणपतीच्या एकदंताच्या ब्रह्मैक्याचें पूर्ण ज्ञान झाले असे म्हणता येत नाही. ह्या योग्याची तर गोष्ट सोडा, पण ज्या योग्याची सर्व ठिकाणी समबुद्धि झाली आणि सर्व भूतांमध्ये आपणच आहो व आपणामध्ये ही सर्व भूतें आहेत असे जो पाहतो :- "**सर्व भूतस्थमात्मानं सर्व भूतानिमात्मानं सर्व भूतानिचात्मनि। ईक्षते योग युक्तात्मा सर्वत्र समदर्शन:।।**" (भ.गी. ६/२६), त्याने देखील एकदंताच्या ब्रह्मैक्याची जी गुह्य खूण ती अनुभवली असे म्हणता येत नाही. "**तरी भक्ती प्रेम सुख दुर्लभत्या।।**" ही प्रेम खूण एखादाच जाणतो, आणि तो देखील सद्गुरुच्या पूर्ण कृपेनेच जाणतो :- "**तुका म्हणे कृपा करील नारायण। तरिच हे वर्म पडे ठावे।।**" अशी ज्याच्यावर सद्गुरुची विशेष कृपा होते, तोच मला निर्गुणत्वे अनंत, आणि मी सगुणतां ही निर्गुणचि असे, असे तत्त्वत: पाहतो. तो "**सर्व भूतस्थितं यो मां भजत्येकत्व मास्थित:। सर्वथा वर्तमानोऽपि सयोगी मयिवर्तते।।**" (भ.गी. ६/२१) तो

"भजत्येकत्वम" मला एकट्यालाच म्हणजे सगुणश्वराला पाहतो. तो माझ्या ठायींच वआस अर्थात् माझ्याशीच ऐक्य पावतो. म्हणून श्री नारायण महाराज "एकदंत गणपतीला"च भजावयास सांगतात :- **"जेथें भावकाला समस्त अटतीं ते शेष सोडू नको।।" "श्री नारायण एक देव दुसरा तू देव ध्याऊं नको।।"** "शेष" म्हणजे प्रेमखूण, जी प्रेमखूण आपणाला कळावी म्हणून तुकाराम महाराजांनी ईश्वराची वारंवार प्रार्थना केली होती :- **"जाणोनि नेणतें करी माझें मन। तुझी प्रेम खूण देऊनियां।।", "हेंचि दान दे गा देवा। तुझा विसर न व्हावा।। गुण गाईन आवडी। हेंचि माझी सर्व ही जोडी।।" "ध्यानी रुप तुझे नाम निरंतर। आपुला विसर पडो नेदीं।।"** म्हणून सद्गुरुनें आपल्याला जी प्रेम खूण दाखविली, तिचा आपणाला कधी विसर पडू नये, व ती दाखविली त्यावेळी जी आपली स्थिती झाली होती, त्या स्थितींत आपण नेहमी असावे अशी साधकाने सदोदीत ईश्वराची प्रार्थना करावी. अशी स्थिती प्राप्त झाली म्हणजे मग जग दिसले म्हणून कोठे बिघडते ? नारायणच जग बनला आहे अशी त्याची खात्री असते :- **"यच्चकिंचिज्जगत् सर्वं दृश्यते श्रुयतेऽपिवा। अंतर्बहिश्चतत्सर्वं व्याप्य नारायण स्थित: ।।"** म्हणून जगाला पाहून कंटाळू नये किंवा भिऊं नये तर :- **"श्री नारायण एक देव दुसरां तूं देव ध्याऊं नको।।"**, तो **"एकदंत गणपति", "अपाणिपाद सगुणेश्वर"** आहे असे मानून त्याचे ध्यान करावे. जेव्हा भगवंताने ब्रह्मदेवाला "एकदंताचें" ज्ञान दिले, तेव्हा त्याने :- **"एकांत भक्ती गोविंदे यत्सर्वत्र तदीक्षणम्।।"** सर्व चराचरांचा अंत एका नारायणात झाला आहे, नारायणाशिवाय दुसरे काही नाही. नारायणच सर्व बनला आहे. अशा भावनेने त्याचे ध्यान केले :- **"तें हें कल्पादी। चतु:श्लोक पद बंधी। उपदेशिलें सद्बुद्धि। निजात्म बोधी विधाता।।"** नारदानें हाच बोध व्यासाला केला. ज्याने उत्तर मिमांसा प्रतिपादन केली. अर्थात् ज्याचे अन्वय व्यतिरेक ज्ञान करतलामलकवत्, त्या व्यासाला देखील पूर्ण सुखाचा अनुभव नव्हता. **"वेदार्थ सकळ पुराणा। व्यासें केलें निर्माण। परी तो न पवेचि आपण। निज समाधान हिताचें।।"** ह्यावरून तुकाराम महाराजांच्या उक्तींत किती सत्य

आहे ह्याची आपली खात्री होती :- **"आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त। तरी भक्ति प्रेम सुख दुर्लभत्यां।।"** व्यासाठी तळमळ नुसत्या अन्वय ज्ञानानें गेली नाही हें नारदानें जाणले :- **"तों वरी तळमळ रे। नाहीं भक्ति बळ रे।।"** तेव्हा नारदाने व्यासाला भक्ती सुत्रें दिली व भागवत लिहून भगवंताचें गुणानुवाद गा म्हणजे तुझी तळमळ शांत होईल असे सांगितले. शिवाय नारदाने व्यासाला एकदंताची ब्रह्मैक्य खूण ही दाखविली :- **"तेणें एकांती नेऊनी देख। व्यासासी केले एकमुख।। —- तें नारदाचें वचन। करीत संशयाचें दहन। तवं व्यासासी समाधान। स्वमुखें पूर्ण होसरलें।।"** एकदंताची एक निष्ठेने भक्ति केल्यावर देहांती महानिरंजन पद म्हणजे वैकुंठात स्थान मिळते :- **"ब्रह्मानंद महानिरंजन पदीं जाऊन येऊं नको।।"** ह्या वैकुंठाचे भगवद्गीतेत असे वर्णन केले आहे :- **"न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः। यद्गत्वा न निवर्ततें तद्धाम परम मम।।"** (भ.गी. १५/६) तेथे जाण्यापूर्वी अशा भक्ताच्या हृदयांत शुद्ध सत्त्वाची चतुर्भुज सगुणमूर्ती तयार होते, आणि देह पडल्यावर ती वैकुंठास जाते :- **"नामा म्हणे माझे सांवळे विठाई। संचरोनि राहीं हृदयामाजी।।"** उत्तम भागवत् झाल्याशिवाय असलें शुद्ध सत्त्व आंगी येणार नाही आणि उत्तम भागवत होण्याला व्यतिरेक अन्वय ज्ञान आणि सगुण ज्ञान उत्तम दर्जाचें पाहिजे :- **"सत्यं ज्ञान अनंत। परब्रह्मचि मी निश्चित। ऐसें जाणूनी मज भजत। उत्तम भागवत तो जाणा।।"** सारांश किडी मुंगीपासून ते ब्रह्मादेवा पर्यंत जाणणाऱ्या देवाला आपण जाणले पाहिजे, तेव्हाच आपण वैकुंठाला जाण्यास योग्य होऊ.

**"मुकुटीं उपनिषदें कुसुमें शोभती।।"**

गणपतीच्या मुगुटावर जीं फुलें आहेत, ती उपनिषदांचे द्योतक आहेत. उपनिषद हा शब्द उप - जवळ व निसद - बसणें ह्या दोन शब्दांपासून बनला आहे. तेव्हा उपनिषद म्हणजे सद्गुरुजवळ बसून अध्यात्मिक विषयांवर त्यांचे जें अमृततुल्य विवेचन होते ते श्रवण करणे व आपल्या ज्या शंका असतील त्यांचे निरसन करून घेणे. ज्या ग्रंथांत अध्यात्मिक विषयांवर सद्गुरुचे झालेले विवेचन व शिष्यांसी झालेला संवाद ग्रंथीत केला असतो, त्या ग्रंथाला ही उपनिषद म्हणतात.

अशा ह्या संवादातच अमूल्य अध्यात्मिक तत्त्वें निपजली आहेत :- "**वादे वादे जायते तत्त्वबोध:।।**" वेदाला पक्ष्याची उपमा दिली आहे आणि गुरुचा आदेश त्याचा आत्मा आहे. म्हणून नुसत्या वेदाध्ययनानें आत्मस्वरुपाचें ज्ञान कधीच व्हावयाचें नाही. ते होण्याला गुरुचा उपदेशच पाहिजे. यावरून गुरुचा उपदेश वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे हे उघड आहे. हा उपदेश सद्गुरु गणपती मुमुक्षूला कसे करितों हें पुढल्या चरणांत दाखविलें आहे :- "**सूक्ष्म ज्ञानचक्षू कृपेंनें पाहती।।**"

सद्गुरुच्या दृष्टींत इतकी कृपा भरली आहे की त्यांच्या नुसत्या कृपाकटाक्षाने तदीक्षणानें मुमुक्षूची व साधकांची पातके नष्ट होतात :- "**कृपाकटाक्षें जाळूंनि देवा मम सर्व ही पापा।।**" श्रीकृष्ण भगवंतानें झाडांकडे, गाईंकडे, गोपींकडे व गोपाळांकडे पाहून त्यांची सर्व पातके भरुप करून टाकिली, व त्यांना पूनित केले. सद्गुरुनें कृपेनें पाहिल्याशिवाय शिष्याच्या अंत:करणांतील रजतम बिलकूल जाणार नाहीत व ते समूळ गेल्याशिवाय त्याला बोध होणार नाही :- "**नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।। तैसी चित्त शुद्धि नाहीं। त्यासी बोध करील कायी।।**" सद्गुरुच्या मुखांतून जे वाक्य येते ते भगवान आपल्या मस्तकावर धारण करितो आणि त्याला आपल्या ऐश्वर्यावर नेऊन बसवितो :- "**मी आदरें वाहोनियां शिरीं। निज ऐश्वर्यावरी बैसवीं।।**" मग त्याला काळभय कोठून राहणार ? "**काळ करील मग जी, जी, जी।।**" काळ भक्तांचा आज्ञाधार होतो हे दर्शविण्यासाठी गणपतीनें मूषकरुपी काळाला वाहन केले आहे असे आरतीच्या पुढल्या चरणात म्हटले आहे :-

"**मूषकरुपी काळा करूनी तूं वाहन।**
**भक्तांचे तें चुकविसी जन्म ही मरण।।**"

हा काळ प्राणी जन्मास आल्यापासून मरे तो पर्यंत त्याच्या एक सारखा हात धुवून पाठी लागला आहे :- "**जातस्य ध्रुवोमृत्यू र्ध्रुवंजन्म मृतस्यच।।**" जो जन्माला आला त्याला मृत्यू हा ठरलेला आहे व जो मेला त्याला जन्मही ठरलेलाच आहे. ह्या रहाट गाडग्यातून सुटण्याला ईश्वरानें उपाय योजून ठेविला आहे. ज्या प्रमाणे रोग उत्पन्न होण्याच्या आधीच औषधाची योजना केलेली

असते, त्याप्रमाणे काळाच्या तडक्यातून सुटका होण्यासाठी सद्गुरुच्या बोधाची योजना केली आहे. जो ही सद्गुरु बोधाची कुसुममाला शिरीं धाम करितो, त्याला मात्र काळ भय नाही :- "**घाली गळी जो सुविचार माला। होईल तो काळ जवा निराळा।।**" तो नुसता गाळाच्या जबड्यातून सुटेल इतकेंच नाही तर :- "**आनंद भोगील निरंजनाचा। तो वर्णितां मौन धरील वाचा।।**" अशी ह्या नरतनूची किंमत आहे. अशी उत्तम नरतनु असून ती बिचारी काळाच्या भक्ष्यस्थानी पडावी ही मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. काळाला उंदराची उपमा दिली आहे ती अगदी बरोबर आहे. जसा उंदीर सर्व  वस्तूंचा कुरतडून नाश करितोस तसा हा काळरुपी मूषक सर्व वस्तूंचा, जीवांचा व उत्तम नरदेहाचा फन्ना उडवितो. म्हणून दयाळू भगवान काळाने भक्तांच्या आसपास फिरकूच नये अशी योजना करितो, काळाला गिळून टाकण्याचे हत्यार, ज्ञान, भक्ताच्या हाती दिले असल्यामुळे तो निर्भय असतो. परंतु जोपर्यंत बुद्धितून पूर्व संस्काराचे ठसे जळून गेले नाहीत, तोपर्यंत काळ त्याच्या भोवती घिरट्या घालीत असतो, म्हणून गणपती आपल्या भक्तांचे संचित जाळून टाकतो, आणि त्यांना क्रियमाणाचा लेप लागू देत नाही.

"**म्हणूनी ज्ञानें जाळुनी संचित लवलाही।**
**क्रियामाणाचा लेप लागू न दे काहीं।।**"

जसजशी वृत्ती स्वरूपामध्ये मुरून जाते. तस तसे संचिताचे ओझे कमी कमी होत जाते. उदाहरणार्थ लाकडाने चांगला पेट घेतला म्हणजे ते हळूहळू जळून भस्म होते व त्यातील सर्व किडी मुंग्या जळून जातात, तसेच बुद्धिरुपी लाकडाचा ज्ञानाग्नीने पेट घेतला म्हणजे बुद्धीत असलेल्या पाप पुण्यरुपी किडी मुंग्या साफ जळून जाऊन त्यात शुद्ध ज्ञानरुपी वन्हीच ठरतो :-

"**यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन।**
**ज्ञानाग्नि: सर्व कर्माणि भस्मसात्कुरुते तथा।।**" (भ.गी. ४/ ३७)

सद्गुरुने बोध केल्याबरोबर संचित जळत नाही, ते जळण्याला चित्तचैतन्य योग झाला पाहिजे. तो योग होण्यास अभ्यास आणि वैराग्याची अत्यंत आवश्यकता आहे. तो अभ्यास कसा करावा हे श्री नारायण महाराजांनी एका श्रुतीच्या आधाराने

दाखविले आहे :- "**पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा यावत्पतति भूतले। उत्थायच पुनः पीत्वा पुनर्जन्म न विद्यते।।**" ह्या अभ्यासाच्या योगाने वृत्ती स्वरुपांत मुरून त्याच्याशी तद्रूप होते, अशा रीतीने चित्तचैतन्याचा योग झाला म्हणजे संचित दग्ध होते :- "**जैसा अंगार दशेचा वन्ही। अंगाराचा न्यास करूनी। निर्वाणस्वरुपी विसवुनी। जैसा लीन होय। तैसा ब्रह्मज्ञानी हताश। करी देहत्रयाना नाश। गिळूनी साक्षित्व प्रकाश। लीन होय स्वरुपी।।**" अशा रीतीनें देहत्रयाचा ऱ्हास झाल्यावर संचितच रहात नाही, म्हणून श्री नारायण महाराज म्हणतात :- "**तूं तें देह नसे शुभाशुभ कदातत्कर्म तें ही नसे। ऐसें हें निज मानसीं समजतां प्रारब्ध रेषा पुसे।।**"

आता क्रियमाण कसे जाते ह्या संबंधाने गीता म्हणते की :-

"**अपिचेसिपापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः। सर्व ज्ञान प्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि।।**" (भ.गी. ४/३६)

ज्ञाननौकेत बसल्यावर प्रपंचरुपी समुद्रांत किती ही तुफान झाले तरी नौकेंत बसणाऱ्या इसमाच्या अंगावर पाण्याचा (क्रियमाणाचा) एक थेंबही उडत नाही. साधकोत्तम संपूर्ण कर्मे करीत असता आपली अकर्तृता कशी सांभाळतो व पूर्व संस्कार रुप जड संस्कार रुप जड भ्रांति चिदात्मत्व स्मृतीनें कशी मोडितो हे पुढील श्लोकात भगवंताने अर्जुनाला स्पष्टरीतीने सांगितले आहे :- "**नैव किंचित्करोमिति युक्तो मन्येत तत्ववित्। पश्यन्श्रृण्वन्स्पृश त्रियघ्रन्नश्नन्गच्छस्वपन्स्तसन।।**" (भ.गी. ५/८-९) डोळ्यातून वृत्ती येऊन ती पाहण्याची क्रिया करितो हाताने देण्या घेण्याची क्रिया तीच करिते. अशी रीतीने साधक आपण साक्षी आहों या त्रयस्थ नात्याने आपल्या देहांतील सर्व क्रिया करितों :- "**साक्षी चेता केवलो निर्गुणश्च।।**" या प्रमाणे सिद्ध निर्विकार स्थितींत राहून त्याच्या प्रपंचाच्या सर्व क्रिया होत असतात. परंतु त्याचा त्याला पत्ताच नसतो. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात की, देवा! मला नेहमी सविकल्प स्थितींत ठेव. मला निर्विकल्प समाधी सुख नको :- "**तुका म्हणे ऐसें झालिया वांचून। करणें तें तें शीण वाटतसे।।**" ज्याची चालतां बोलतां, खातां पीतां

अन्यव समाधी लागते, आणि जो सगुणसर्वात्म भक्ति करितो, असा जीवन्मुक्त सगुण मोक्ष भोगण्यास योग्य होतो :- **"ज्ञानी आणि हरिभक्त। ज्ञान ज्याचे भक्ति युक्त। तो होऊनि ही जीवन्मुक्त। अंती पावे सगुण मोक्ष। अर्थ ऐसा।।"**

नुसत्या निर्विकल्प अन्वय समाधीच्या योगाने सायुज्यता प्राप्त होईल, पण सगुण मोक्ष-वैकुंठवास मिळणार नाही. तो प्राप्त होण्यास निर्गुण ज्ञानास सगुण भक्तीची जोड पाहिजे. तो आपणास प्राप्त व्हावा म्हणून आरतीच्या शेवटल्या चरणांत सद्गुरु गणरायाची येणे प्रमाणे प्रार्थना केली आहे :-

**"अनन्य भक्ती हि मंगळ मूर्ती मोरया देईं।**
**अंती हृदयीं तुझ्या वैकुंठी नेईं।।"**

ज्ञान झाल्यावर अनन्य भक्ति, निर्मळ भक्ति - पराभक्ति - गुरुदेव भक्ति केल्यानेच ज्ञानी भक्त वैकुंठास जावयास योग्य होतो :- **"माचंयोऽव्यभिचारेण भक्ति योगेन सेवते। सगुणान्समती त्यैतान् ब्रह्म भूयाय कल्पते।।"** (भ.गी. १४/२६), व पुढे त्या भक्तीच्या परिपाके करून देह प्रारब्ध संपल्यावर :- **"भक्त्यामामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः। ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम्।।"** (भ.गी. १८/५५) तो ज्ञानी भक्त भगवंताच्या हृदयात असणाऱ्या वैकुंठास जातो. तेव्हा आपणा सर्वांस वैकुंठवास प्राप्त व्हावा म्हणून आपण सद्गुरु गणरायाची प्रार्थना करू :- **"गंगासागर रीती भक्ति मज द्यावी...।।"**

**: नारायण :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री सद्‌गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**शुक्रवार : ३०.४.४३**
**सकाळी : ८.१० ते ८.५०**

(अंबादासच्या घरी गोपाळाचे कीर्तन प.पू. श्रीदादाभाई घरीच विश्रांतीसाठी होते)

आम्हाला काय झोपले तरी सारखे, बसलें तरी सारखे. कारण अधिष्ठान सिद्धासनी क्षिप्रसिद्धि जगद्रूप मी ब्रह्म तेसी प्रसिद्धि। शरीरें फिरावें उठावें बसावें, परी नित्य योगासनीं त्या असावें।।

राजयोग

श्री वामन पंडिताचा अधिकार फार मोठा होता पण त्यांना कोणी ओळखले नाही. सर्व जण प्रारब्धाकडे पाहतात. सामान्य माणसांप्रमाणे त्यांनाही प्रारब्ध असते. श्री तुकाराम महाराजांचे प्रारब्ध निराळे होते तर श्री रंगनाथ स्वामीचे निराळे. तसेच जनक, अमृतराय इत्यादी सर्वांचे प्रारब्ध निराळे. पण अनुभव सर्वांचा एक. हा देह प्रारब्धाधीन आहे.

देह तंव आहे प्रारब्धा आधीन। त्याती मी कां क्षीण वाहूं भार ---- भिक्षू ---- अद्वैत बोधपद निश्चय पूर्ण झाला.

श्रीबाबांकडे एक भिकारी आला होता. तो ब्रह्मनिष्ठ होता हे श्रीबाबांनी लगेच ओळखले. कारण संतांना संतच ओळखतात. संत भिकारी झाला म्हणून काय झाले ? संत सर्व त्या स्थितीत व्यवहार करतात.

**सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते**

सर्व लोकेषणा सोडली पाहिजे. काहीच जर नाही मग लाज कसली ?

**येथे देह नव्हे, खरें जग नव्हें हा सत्य मृत्यू नव्हे।**

**काहीं पाप नव्हे, खरा यम नव्हे, हा सत्य मृत्यू नव्हे।।**

पण कोणाला तर ?

**ज्ञात्या दु:ख नव्हे, मूढागती नव्हे, त्या भास खोटा नव्हे।**

**ब्रह्मानंद -निमग्न चित्त असतां काहींच कांही नव्हे।। (ना.म.)**

तो सर्व जग आनंदरुप पाहतो. ज्याची बुद्धि आत्मस्वरुपाच्या ठिकाणी लीन झाली त्याच्या दृष्टीने काहींच नाही. ते स्वत: आनंदरुप होतात व जगालाही आनंदरुप करतात -

**अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक ।।१।।**

एक मि. वाटेल त्याला समाधी देऊ. ज्याच्यावर भगवत्कृपा पूर्ण त्यालाच समाधी म्हणजे हाताचा मळ आहे. नाहीतर अत्यंत कठीण आहे.

**क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।**

**अव्यक्ता हि गतिर्दु:खं देहवद्भिरवाप्यते।। (भ.गी.)**

**आला आला हृषीकेशी न कळे कोणासी।**

**संतसज्जनासी दृष्टीपडे।।१।।**

जसे आपण एकमेकांना पाहतो तसा त्यांना ईश्वर दिसतो.

**अभक्त शोधिती कोटि वर्षे ज्याला।**

**नाहीं देखियेला कृष्णजीला।।२।।**

**द्रौपदीच्या भावा पावलासा देव।**

**देखतां माधव सुखावली।।३।।**

द्रौपदीवर कितीही संकटे आली तरी भगवंताला पाहताच ती आनंदरुप होत

असे.

**आतां नाहीं चिंता आम्हां कदाकाळीं।**

**रक्षी वनमाळी तुका म्हणे।।४।।**

हाक मारली की भगवान हजर आहेच. कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं असा भगवान आमचा पाठीराखा आहे. तो आमचा योगक्षेम वाहतो. मग आम्ही कोणाच्या मुखाकडे पाहावे ?

**अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।।१।।**

**जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया।।२।।**

**सर्व सुकृताचे फळ मी लाहीन। क्षेम मी घेईन पांडुरंगी।।३।।**

**बापरखुमायेदेवीवरू विठ्ठलाची भेटी।**

**आपलु संवसाठी घेऊनी राहे।।४।।**

प्रपंच कसा आनंदरुप करता आला ? तर निरंतर गोविंदाचे ध्यान केले.

**गोविंद गोविंद। मना लागलीया छंद।।१।।**

**मग गोविंद ते काया। भेद नाहीं देवा तया।।२।।**

**आनंदले मन। प्रेमें पाझरती लोचन।।३।।**

**तुका म्हणे आळी। जेवीं नुरेचि वेगवी।।४।।**

असा गोविंदाचा छंद लागल्यावर सर्व विश्व गोविंदरुप होईल. सारांश ही गोडी लागली पाहिजे. ती सत्संगतीशिवाय मिळणार नाही. म्हणून समर्थ म्हणतात भलतेनी सत्संग करावा. परमार्थांत मुख्य सत्संगत आहे. पण ही सत्संगत मिळणेच कठीण आहे. सुंदरदास म्हणतात :-

**तात मिले पुनि मात मिले सुत। भ्रांत मिले युवती सुखदाई।।**

**राज मिले गज वाजि मिले सब। साज मिले मन वांछितपाई।।**

**इहलोक मिले सुरलोक मिले। बिधीलोक मिले वईकुंटही जाई।।**

**सुंदर और मिले सबही सुख। संत समागम दुर्लभ भाई।।**

**कोटी जन्माची पुण्यसंपत्ती। जरी आयति असेल गांठी।।**

**तरीच जोडे माझ्या संतांची संगती। सत्संगे भक्ति उल्हासे।।**

पण श्रीनाथ म्हणतात :-

**ऐसें प्राप्त पुरुष। संसारी नाहीं गा बहुत।**

**हिंडता अवघ्या जगांत। एखादा कदाचित देखिजे।।**

भगवान म्हणतात माझे संत म्हणजे मी पाठविलेले (श्री तुकाराम महाराज, ज्ञानदेव, श्रीए. महाराज, श्रीरा. प. इत्यादीकांसारखे संत) जे नखशिखांत प्रेमाने भरले आहेत ते संत. कारण विहिरीत नसेल तर पोहऱ्यांत कोठून येणार ? अशा संताच्या संगतीत निरंतर राहिल तो संतच होणार संगतीचे माहात्म्यच असे आहे मग तेथे काही साधन करायला नको म्हणून श्री तुकाराम महाराज म्हणतात :-

**पडोनिया राहीं। उगाचि संतांचिये पायीं।।१।।**

**नलगे पुसावे सांगावे। चित्त शुद्ध करीं भावें।।२।।**

**सहज ते स्थिती। उपदेशपर युक्ति।।३।।**

**तुका म्हणे भाव। जवळि धरूनि आणि देव।।४।।**

आम्हाला एवढे प्रेम कसे प्राप्त झाले तर केवळ श्रीभाईंची संगत मिळाली म्हणूनच सर्व संग परित्याग कराल तरच सत्संग मिळेल. मग तेथें :-

**आपणांसारिखे करिती तत्काळ। नाहीं काळवेळ तयालागीं।।**

**(तुकाराम महाराज)**

तात्पर्य जगतांत संतासारखे हितकारी कोणी नाही.

**जगत माही संत परम हितकारी।।धृ.।।**

**प्रभुपद प्रगट करावत प्रीत। भरम मिटावत भारी।।१।।**

जग खरे वाटणे हाच भ्रम कारण भगवानच सांगतात :-

**अर्जुना तूं जाण रे। होशील सुजाण रे।**

**विश्व नाही मीच आहे। सखया तुझी आण रे।। (वा.पं.)**

**परमकृपाळू सकळ जीवनपर। हरीसम सब दु:ख हारी।।२।।**

**त्रिगुणातीत फीरत बन। त्यागी रीत जगतसे न्यारी।।३।।**

संत हे निरंतर तिन्ही गुणाच्या पलीकडे असणारा जो शुद्धसत्वगुण त्यात नेहमी संचार करतात.

**ब्रह्मानंद संतनकी सोबत। मीलत है प्रगट मुरारी।।४।।**

भगवान तेथे नेहमी हजर असतो.

**नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवो।**

**मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद।।**

नारदाने एकदा भगवंताला विचारले, देवा तुमचे असे एखादे ठिकाण सांग की जेथे आपली अपचूक भेट होईल तेव्हा भगवान म्हणतात जेथे माझे अनन्य भक्त माझे गुण गातात. स्वत: रममाण पावतात व इतरांना रमवतात तेच माझे वैकुंठ.

**तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी। प्रेमें घाली उडी नामासाठी।।**

संतांच्या सभेत भगवान नेहमी हजर असतात म्हणून तेथे त्यांची सहज प्राप्ती होते. संतांना तो नेहमी दिसतो. पण आम्हाला दिसत नाही. तेवढी अंत:करण शुद्धि झाली म्हणजे दिसेल. भक्तांना मात्र तो नेहमी दिसतो. त्यांच्या लीला भगवंताला व भगवंताच्या भक्तांनाच समजतात.

**देवभक्तपण। तुका म्हणे नाही भिन्न।।**

**रामहिं दाता मुक्तिका। संत जपावे नाम।**

**रामनामके ते अधिकारी। जिनके सतसंगत अतिप्यारी।।**

ज्याला सत्संग प्रिय तोच नामाला प्रिय आहे. नुसती माळ ओढून काय उपयोग.

***मनका ——बाहेर माला जपना क्या?** म्हणून

**आधी मन मुंडा मन मुंडा। मग तुम्ही ब्रह्मचि धुंडा।।१।।**

**मनचि मुंडले नाही। तेथें ब्रह्मचि (सद्गुरु) करील कायी।।२।।**

म्हणून वसिष्ठमुनी राम प्रभूला सांगतात :-

**उपदेशक्रमोरामा व्यवस्था मात्रपालनम्।**

**ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा । शिष्य प्रज्ञैप केवला।।**

शिष्याची शुद्धमती हीच बोधाला कारण आहे. गुरु हा व्यवस्थापालनार्थ आहे. भगवंताने आपला जो शुद्धसत्वगुण, दिव्यचक्षु दिला पाहिजे.

**गोपाळनाथ सांगे सोयी। लगा तुम्ही सद्गुरुचे पायी।।३।।**

म्हणून श्री तुकाराम महाराज म्हणतात :-

**सद्गुरुवांचोनि सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं आधीं।।१।।**

म्हणून भगवान सांगतात :-

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**

**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञान्तिस्तत्त्ववर्शिन:।। (भ.गी.)**

पण हल्लीचे कित्येक विद्वान गुरु म्हणतात. सर्व संतांनी गुरु केले व हल्लीचे लोक म्हणतात गुरुशिवाय आम्ही संत होतो. आम्ही कसे कबूल करावे? श्री वामन पंडित षड्शास्त्रसंपन्न, वेदमुखोद्गत पण काय म्हणतात:-

**सहज केवळ ते न तुम्हां कळे। बहुत तर्क बलेंहिन आकळे।।**

**गुरुमुखाविण ते नकळे गती। म्हणुनि बोलति येचीरीती श्रुति।।**

**तद्विज्ञानार्थ स गुरुमेवाभिगच्छेतसमित्पाणी।**

**श्रोतियं ब्रह्मनिष्ठम आचार्यवान्पुरुषो वेदेति।।**

**श्रुति तस्मादगुरुं प्रपद्येत जिज्ञासु: श्रेय उत्तम।**

**शब्दे परेच निष्णाते ब्रह्मण्युपशमाश्रयम् भागवत।।**

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**

**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन:।। (भ.गी.)**

पण कित्येक म्हणतात आत्मदर्शनाला दुसऱ्याची जरूरी कशाला? पण त्यांना एकच सांगावे आपली दोन रुपें आहेत स्थूळ व सूक्ष्म. आपले हे स्थूळ रुप जर आरशाशिवाय दिसत नाही मग सूक्ष्म रुपकसे दिसणार. येथे आरसा म्हणजे सद्गुरु. ज्याला आत्मसाक्ष पाहिजे त्याने ह्या वादविवादाच्या भानगडीत पडू नये. आमचे आद्यगुरु श्रीना. महाराज सांगतात :-

**लोकीं वाद नको, अहंमती नको**

**मुख्य ते पाहिजे गळाली अहंता। उपदेश घेतां गोड वाटे।।**

**पत्नी विचरतां पर पुरुषी। देखोनी स्वपती त्यागी तिसी।**

**तेविं अभिमानरत पुरुषासी। मी हृषीकेशी कदा नातले।। (ए.भा.)**

ह्या मंडळींचे ऐकले तर भगवान आपणापासूनच दूर जाईल. आपल्या हाकेला ओ देणार नाही. श्रीभाईंचे follower म्हणतात व वादविवादांत पडतात. त्याला follower म्हणत नाही. त्यांनी जी शिकवणूक दिली त्याप्रमाणे वागले पाहिजे नाहीतर I am your most obedient servant but I don't want to listen what you say. हा कसला नोकर? प्रभू येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना म्हणाले तुम्हाला जे सांगायचे ते सांगितले आता मी एकांतात जातो. Now don't disturb me you follow me प्रभूला व त्यांच्या शिष्य मंडळींना

हे वियोग दु:ख सहन होईना. एकमेकांकडे पाहतात व पुढे चालतात. पण प्रभू मनात म्हणाले हा मोह आहे तो आवरलाच पाहिजे व ते पुढे विदेह स्थितीत चालू लागले. बरेच दूर गेले तरी पण त्यांना पावलांचा आवाज येऊ लागला. ते म्हणाले, अजून माझे प्रारब्ध संपले नाही का ? म्हणून त्याने मागे वळून पाहिले तो आपलेच लोक. तेव्हा त्यांनी विचारले तुम्ही का आलात ? ते म्हणाले तुम्हीच सांगितलेच ना you follow me प्रभूंनी कपाळाला हात लावला ते म्हणाले माझ्या सांगण्याचा अर्थ हा की मी जी तुम्हाला शिकवणूक दिली, ते माझे उदाहरण डोळ्यापुढे ठेवून अंमलात आणा. पण आता ते लोक हुशार झाले आहेत. पण आमचा उद्धव पहा भगवंताने जे सांगितले नाही तेच मागतो. भगवान म्हणाले, उद्धवा, ज्या मुक्तिसाठी सर्व मुनी जप तप करतात. ती मुक्ती तुला सहज देतो पण उद्धव म्हणाला मला ते मातृहंति ज्ञान नको. भगवंताला हे ऐकून फार अत्यानंद झाला व त्यात उद्धवाला त्याने कडेवर घेतले व त्याचे कौतुक केले.

**सुखे सुखावली कृष्णमूर्ती। डोळे लागले स्वानंदास्थिती।**
**तेणे संतोषें भुक्ति मुक्ति। उद्धवा हाती अर्पियेली।। (ए.भा.)**

व म्हणाले बाळ तुझ्यामुळे जगताला ह्या भक्तीची प्राप्ती होऊन ते आनंदरुप होतील व ही भक्ती करून वैकुंठालाा कसे जावे हे श्री तुकाराम महाराजांनी स्वत:च्या उदाहरणाने प्रत्यक्ष दाखविले. तात्पर्य सत्संगतीत राहून हे समजत नाही मग सत्संगतीशिवाय कसे कळणार. त्याला गुरुकृपा, भगवत्कृपा पाहिजे.

◈◈◈

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

# (जानेवारी ते मार्च २०२२) महिन्यातील उत्सव व महोत्सव

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. १.१.२०२२ | गोखिवरे (वसई पूर्व) येथील श्री कृष्णमूर्ती स्थापना दिन. |
| शुक्रवार | दि. १४.१.२०२२ | मकरसंक्रांती सायंकाळी तिळगूळ घ्या गोड बोला ह्या विषयावरील प्रवचनाचे श्रवण. |
| सोमवार | दि. २४.१.२०२२ (पौष कृ. ६) | श्री तात्यासाहेब कोटनिस महाराज पुण्यतिथी दिन. |
| शुक्रवार | दि. २८.१.२०२२ (पौष कृ. ११) | श्री पार्वतीमाता पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी सायंकाळी पार्वतीमातेच्या चरित्राचे वाचन. |

## परात्पर गुरु श्री नारायणबाबा रत्नागिरीवासी व परमेष्ठिगुरु श्री राधाकृष्ण तोरणे यांचा पुण्यतिथी महोत्सव

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. २.२.२०२२ (माघ शु. १) | मातोश्री श्री लक्ष्मीबाई रामचंद्र टाकी यांचा वैकुंठारोहण दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी त्रोटक चरित्राचे वाचन. |
| बुधवार | दि. २.२.२०२२ (माघ शु. २) | श्री नारायणबाबा व श्रीराधाकृष्ण तोरणे महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी श्री राधाकृष्ण तोरणे यांच्या त्रोटक चरित्राचे वाचन. |
| गुरुवार | दि. ३.२.२०२२ | सायंकाळी हळदीकुंकू. |
| शुक्रवार | दि. ४.२.२०२२ (माघ शु. ४) | श्री गणेश जयंती सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी श्री सिद्धिविनायकाचे व्यापक स्वरूप या विषयावरील प्रवचनाचे वाचन. सायंकाळी नामसंकीर्तन. |

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. ५.२.२०२२ (माघ शु. ५) | वसंत पंचमी (श्रीशांतादुर्गा महोत्सव) व सद्भक्ती बाळमंडळाचा वाढदिवस. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्रीकृष्ण भक्तिपर पदे व वैकुंठीचा प्रसादमेवा ह्या सद्गुरु दादाभाईंच्या आशिर्वादपर प्रवचनाचे वाचन. |
| सोमवार | दि. ७.२.२०२२ (माघ शु. ७) | रथसप्तमी. सकाळी स्तवन व प्रार्थना. महोत्सव समाप्ती. |
| बुधवार | दि. १६.२.२०२२ (माघ शु. १५) | माघ पौर्णिमा (श्री मंगेशोत्सव) सकाळी स्तवन व प्रार्थना. रात्रौ ९.०० वाजता रामेश्वर मंदिरातर्फे पालखी व मिरवणूक. |
| शुक्रवार | दि.२४.२.२०२२ (माघ शु. ९) | श्री रामदास नवमी. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी श्री रामदास स्वामींच्या चरित्राचे श्रवण. |
| मंगळवार | दि. १.३.२०२२ (माघ शु. १४) | महाशिवरात्री. सकाळी स्तवन व प्रार्थना. (दुसऱ्या दिवशी) श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक सकाळी ६.३० वाजता. |
| शुक्रवार | दि. ४.३.२०२२ (फाल्गुन शु. २) | श्री रामकृष्ण परमहंस जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी भजनाचे वेळी श्री रामकृष्ण जयंती विषयावर दि. ६ मार्च १९२७ रोजी खारमिशनमध्ये झालेल्या प्रवचनाचे वाचन. |
| **श्री दत्तमूर्तींच्या व श्री नारायण महाराजांच्या सुवर्णा पादुकांचा व श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन व श्री रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिन महोत्सव** | | |
| बुधवार | दि. ९.३.२०२२ (फाल्गुन शु.७) | श्री रघुनाथस्वामी पादुका स्थापना दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी ११.३० वाजता श्री गुरुपादुकास एकादशणी. |
| रविवार | दि. १३.३.२०२२ (फाल्गुन शु.१०) | श्री रामेश्वर व श्री दत्तपादुका स्थापनादिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी ११.३० वाजता एकादशणी नंतर ब्राह्मण संतर्पण. सायंकाळी जगदाराध्य त्रिमूर्तींच्या पादुकांची स्थापना या |

| | | |
|---|---|---|
| | | विषयावरील प्रवचनाचे श्रवण (श्री भाईंची प्रवचने पुस्तक क्र. १०४) रात्रौ ९ वाजता पालखी व मिरवणूक. |
| सोमवार | दि. १४.३.२०२२ (फाल्गुन शु.११) | प्रात:स्मरणाचेवेळी श्री एकनाथ महाराजांचा फोटो ठेवणे. सायंकाळी श्री एकनाथ महाराजांचे ओवीबद्ध प्रतिष्ठान चरित्र वाचनास प्रारंभ. |
| **गुरुवर्य श्री दादाभाई पुण्यतिथी महोत्सव** | | |
| शुक्रवार | दि. १८.३.२०२२ (फाल्गुन शु.१५) पौर्णिमा | श्री गौरांग प्रभू जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| शनिवार | दि. १९.३.२०२२ (फाल्गुन वद्य १) | श्री दादाभाई पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. नंतर ब्राह्मण संर्तपण व महाप्रसाद. सायंकाळी श्री दादाभाईंच्या चरित्राचे वाचन व श्री दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाचे श्रवण. शेजोत्सव रात्रौ ८ वाजता. |
| रविवार | दि. २०.३.२०२२ (फाल्गुन वद्य २) | श्री तुकाराम महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि. २१.३.२०२२ | सायंकाळी श्री दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| बुधवार | दि. २३.३.२०२२ | एकनाथषष्ठी - एकनाथ महाराज पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. प्रतिष्ठान चरित्राच्या श्रवणाची समाप्ती. सायंकाळी श्री दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाचे श्रवण. उत्सवाची समाप्ती व कळकळीची प्रार्थना. |
| **एप्रिल ते जून २०२२ महिन्यातील उत्सव व महोत्सव (चैत्र मास)** | | |
| शनिवार | दि. २.४.२०२२ (चैत्र शु. १.) | गुढीपाडवा<br>सकाळी स्तवन व प्रार्थना. |

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. ९.४.२०२२ | आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज व श्री लक्ष्मण महाराज यांच्या इंदूर येथील पादुका स्थापनेचा वर्धापन दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी श्री लक्ष्मण महाराजांच्या चरित्राचे वाचन. |
| रविवार | दि. १०.४.२०२२ | श्री रामनवमी व श्री सोहिरोबानाथ पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्री रामजन्म दुपारी १२ वा. पाळणा. रात्रौ ९ वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| शनिवार | दि.१६.४.२०२२ | श्री हनुमान जयंती. सकाळी ६.३० वाजता हनुमान जन्म. स्तवन व प्रार्थना. रात्रौ ९वाजता पालखी मिरवणूक. |
| शनिवार | दि.३०.४.२०२२ (चैत्र वद्य १५) | श्री पार्वतीमाता जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| | **(वैशाख मास)** | |
| मंगळवार | दि. ३.५.२०२२ | अक्षय तृतीया श्री परशुराम जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| | **परम भगवत् भक्त श्री वामन पंडितांचा पुण्यतिथी महोत्सव** | |
| शुक्रवार | दि. ६.५.२०२२ (चैत्र शुद्ध ४) | श्री रामानुजाचार्य व श्री शंकराचार्य जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी हळदीकुंकू. |
| शनिवार | दि.७.५.२०२२ (चैत्र शुद्ध ५) | श्री वामन पंडित पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद सायंकाळी चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता सद्भक्ती मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| रविवार | दि. ८.५.२०२२ (चैत्र शुद्ध ५) | सायंकाळी नामसंकीर्तन. |

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. ९.५.२०२२ (वैशाख शुद्ध ६) | दुर्गाष्टमी सायंकाळी ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. रात्रौ ८.३० वाजता श्री भाईंचा शेजोत्सव. |
| मंगळवार | दि. १०.५.२०२२ | उत्सव समाप्ती व कळकळीची विनंती. |
| शनिवार | दि. १४.५.२०२२ (वैशाख शुद्ध १३) | श्री नृसिंह जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

**परमगुरुवर्य श्री शंकर व्यंकटेश टाकी उर्फ**
**श्रीबाबांची पुण्यतिथी उत्सव**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. २९.५.२०२२ (वैशाख वद्य १४) | श्रीबाबांची पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण महाप्रसाद. सायंकाळी चरित्रवाचन. 'पितापुत्र व गुरुशिष्य' या प्रवचन वाचनास प्रारंभ. |

**(ज्येष्ठ मास)**

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ९.६.२०२२ (ज्येष्ठ शु. १०) | गंगावतरण दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. २४.६.२०२२ (ज्येष्ठ व ११) | श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

✦✦✦

# विशेष सूचना

सर्व भक्तांना कळविण्यास आनंद होतोय की आपले संकेत स्थळ, अर्थात वेबसाईट, www.sadbhaktimandir.com आता पूर्णत: कार्यरत झाले आहे. श्री दत्तगुरुंची कृपा, श्री नारायण महाराज जालवणकरांची आज्ञावजा प्रेरणा आणि प.पु. सद्‌गुरु श्री टाकी महाराज ह्यांचे आशीर्वाद पाठीशी असल्यामुळेच हे शक्य झाले.

सद्भक्ती मंदिर, प.पू. श्री टाकी महाराज (तिन्ही पिढ्या), श्री दत्तगुरु परंपरा, संत साहित्य, संत चरित्र, काही निवडक पदांचे श्राव्य प्रसारण (ऑडिओ), काही फोटो, आगामी उत्सव किंवा कार्यक्रमांची माहिती आणि इतर आवश्यक बाबी, इत्यादी उपयुक्त माहिती ह्या संकेत स्थळावर दिली आहे.

सद्भक्ती प्रकाश हे आपले त्रैमासिक देखील ह्या संकेत स्थळावर उपलब्ध केले जाते. सदरहू त्रैमासिक देखील योग्य समयी अपलोड केले जाईल. जिज्ञासूंनी ह्या संकेत स्थळाला जरूर भेट द्यावी आणि आमच्याशी संपर्क साधावा. आपला अभिप्राय अपेक्षित आहे.

अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हे आपले Facebook सदर (पेज) सुद्धा कार्यरत झालेले आहे.

सर्व भक्तांना विनंती आहे की त्यांनी आपल्या व्हॉट्सॲप आणि फेसबुक वरील आणि इतर मित्र परिवारात, ह्या आपल्या दोन्ही प्रसार स्थळांची माहिती देऊन सद्भक्ती मंदिर आणि सद्भक्तीपंथ ह्यांचा जास्तीत जास्त प्रसार होऊन आपल्या प.पु. सद्गुरुंचे विचार आणि त्यांची शिकवण सर्वत्र प्रसिद्ध होण्याकरिता हातभार लावून गुरुसेवेच्या ह्या संधीचा लाभ घ्यावा.

# महत्वाच्या सूचना

ह्या अंकातील आणि ह्या आधीच्या अंकातील उल्लेख केलेले उत्सव - महोत्सव आपल्या सद्भक्ती मंदिरातील प्रथेनुसार देण्यात आलेले आहेत. परंतु विद्यमान सरकारी आदेश आणि त्याप्रमाणे पाळण्यात येणारा लॉक डाऊन ह्यामुळे ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील उत्सव थोडक्यात आणि अल्पावधीत फक्त गुरुजींच्या हस्ते आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरे करावे लागले होते.

तसेच पुढील उत्सव सालाबादप्रमाणे साजरे केले जाणार की वर उल्लेख केल्याप्रमाणे थोडक्यात ओटोपते घ्यावे लागणार हे त्या त्या वेळेस जाहीर केल्या जाणाऱ्या सरकारी आदेशांवर अवलंबून असेल. सद्य परिस्थितीत सरकारी आदेशानुसार कोणताही उत्सव अत्यंत छोट्या प्रमाणात, म्हणजे केवळ गुरुजी आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरा करावा लागणार आहे. पुढील सूचना येईपर्यंत तरी सर्व भक्तांना विनंती आहे की ह्या पुढील उत्सवांच्या तारखांच्या एक किंवा दोन दिवस आधी त्यांनी खालीलपैकी एखाद्या भक्ताशी संपर्क करून नंतरच सद्भक्ती मंदिरात दर्शनाला यावे, जेणेकरून सद्भक्तांची निराशा आणि गैरसोय होणार नाही.

१. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२

२. श्री. समीर रायकर - दू. भ्र. क्र. ९८२००८४०३०

३. श्री. रोहन दळवी - दू. भ्र. क्र. ९८६७४९४७४७

४. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

**टीप :** उत्सवाचे वेळी सध्या आपले माननीय गुरुजी पहाटे सूर्योदयसमयी गाभाऱ्यात, आतल्या आत श्री दत्तगुरुंची नित्यपूजा करतात आणि सर्व पादुकांना अभिषेक करतात. भक्तमंडळी आपापल्या घरी नामस्मरण, वाचन करतात. सरकारी आदेशानुसार भक्तांना दर्शनाकरिता मंदिरात सध्या प्रवेश नाही.

दररोज श्री दत्तगुरुंची नित्यपूजा माननीय गुरुजी पहाटे सूर्योदय समयी करतात. सरकारी नियमाचे पालन करूनच इतर सेवा शक्य तितक्या केल्या जातात.

✦✦✦

# विनंती

सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक आजवर आपण इ.स. १९२८ सालापासून प्रसिद्ध करीत आहोत. सद्‌गुरु श्री भाई, श्री दादाभाई ह्यांचे आणि इतरही संतांचे विचार सर्वत्र प्रसारित होऊन, सद्भक्ती मंदिरातील घडामोडींचा आढावा आणि नजीकच्या काळात होणाऱ्या उत्सव-महोत्सवा विषयीची समग्र माहिती ह्या त्रैमासिकातून भक्तगणांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ह्या नियतकालिकातर्फे आपण करीत असतो.

मुंबई शहराबाहेरील सभासदांना त्यांची प्रत पोस्टाने पाठवली जाते. तर स्थानिक सभासद सद्भक्ती मंदिरात येऊन आपापली प्रत घेऊन जातात.

गेल्या काही वर्षात छपाईच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. सभासदांकडून जी काही वर्गणी पूर्वी घेतली आहे ती त्या काळात योग्य अशीच होती किंवा असावी. मात्र आता त्या वर्गणीच्या रकमेमध्ये हा छपाईचा आणि पोस्टाचा खर्च अजिबात भागत नाही.

**सभासदांकडून अधिक वर्गणी मागण्याची सद्भक्ती प्रसारक मंडळींची इच्छा नाही.**

त्या ऐवजी अलीकडेच विकसित झालेल्या आपल्या वेबसाईटवर सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक अपलोड केले जाईल.

ज्या सभासदांना इंटरनेटची सुविधा नाही किंवा इतर काही कारणामुळे वेबसाईट वरील माहिती वाचणे शक्य नसेल त्यांनी खालीलपैकी एखाद्या कार्यकर्त्यांशी संपर्क करावा. आपापले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस (असल्यास) पाठवून द्यावेत.

ज्यांना हे शक्य आहे त्यांना विनंती आहे की त्यांनी देखील आपले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस वर उल्लेख केलेल्या कार्यकर्त्यांपैकी कुणालाही पाठवून द्यावा, जेणेकरून जेव्हा त्रैमासिक अपलोड केले जाईल तेव्हा त्याची सूचना देता येईल.

**सर्व सभासदाना विनंती आहे की ह्या विनंतीच्या संदर्भात त्यांनी जरूर संपर्क साधावा.**

**संपर्क :-**

१. श्री. विवेक ताम्हाणे - दू. भ्र. क्र. ९८२०३५०८६७

२. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२

३. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

✦✦✦

# : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the Account** | **:** | **SADBHAKTI PRASARAK MANDALI** |
| **Bank Name** | **:** | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | **:** | 00610010000130 |
| **IFSC Code No.** | **:** | NKGS0000006 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| | | **OR** |
| **Bank Name** | **:** | Bank Of India |
| **Account No** | **:** | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | **:** | BKID0000164 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.

**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.
**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | |
|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **भ्रमणध्वनी :** ९८२०३५०८६७ |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **भ्रमणध्वनी :** ९८२१२७०७७२ |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **भ्रमणध्वनी :** ९२२३२२२२४५ |

✦✦✦

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) संत आपल्या अमोघ वक्तृत्वानें अशा काही अमृतमधुर वाणीचा वर्षाव करतात की सारा श्रोतृवृंद तुडुंब आनंदाने तृप्त होतो. त्यांच्या वाणीत विद्युल्लतेचे तेज असते. अमृतालाही मागे टाकणारी चिरंतन अशी गोडी असते. प्रचंड आत्मानुभवाचे पाठबळ मिळते.

२) नुसत्या सात्त्विक दर्शनानेच श्रोतृवृंदांच्या नेत्राचे पारणे फिटावे अशा लोभस मूर्ती सौभाग्यलक्ष्मीचे कमल उमलावे असा आविष्कार. अशी साद, अशी दाद, अशी दखल अप्रमेय आविष्कार! ज्यांनी प्रत्यक्ष अनुभविला अहोभाग्य! दैवी देणगीच ती. माणसांची अंत:करणे आसुसलेली, मनोवृत्ती आतुरलेल्या, दर्शनाने नेत्र उत्फुल्ल कमलांची शोभा पावलेले. त्यांच्या प्रभावाचे रहस्य काय, मर्म काय, प्रत्येक जीवावर मोहिनीच पडते. श्रोतृवृंद जणू वेडाच होतो. त्या वेडात एक निष्ठावंत जिव्हाळाच अनुभवास येतो. अफलातून, आगळे, अजोड, अलौकिक वेड. असे वेड लावणारी कळा गोकुळांतील गौळणींना, राधेला वेड लावणारी बांसरीची व बांसरीवाल्याची. नितांत साधेपणा, निरागस दर्शन, स्वत:ला पूर्णपणे विसरून सेवेत मग्न होऊन त्यातील भावसुखाचा आस्वाद घेण्यात दंग झालेली मूर्तीदर्शन, अत्यंत हृद्य आणि विशालपणे साधे! एकाच नाण्याच्या दोन बाजूंपैकी कोणती बाजू खरी कोणती अधिक चांगली असा विचार असूच शकत नाही. एकाच व्यक्तीत सामावलेल्या पण परमावधीने दूर असणाऱ्या वाटणाऱ्या अवस्था दोन टोकांचे दोन ध्रुव! एकाच जीवनरुपी अक्षाने सांधलेले! वेगळेपण सुद्धा तेच आणि सर्व प्रकार म्हणजेही तेच!

३) सेवा हे ज्यांच्या उभ्या आयुष्याचे एकच व्यवधान असते, ते आपल्या सात्त्विक भावनायुक्त आवाजाने श्रोतृवृंदाला मंत्रमुग्ध करतात.

४) न घडणाऱ्या गोष्टी, चमत्कार संत मुद्दाम आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून करतात असे नाही. कारण त्यांना प्रतिष्ठेची आवडच नसते. परंतु केवळ

दीनदुबळ्या दु:खी लोकांना पाहून त्यांचे कल्याण करण्याकरिता सर्व प्रकृति नियमांचा चालक परमेश्वराशी एकरूप झालेल्या संतांकडून सहज काही लोक विलक्षण घटना घडतात. त्या सर्वदा घडणाऱ्या नसल्यामुळे प्राकृत लोक त्यास चमत्कार म्हणतात.

५) 'प्रसिद्धिपराङ्मुख' हा शब्द आजच्या प्रसिद्धिच्या जगातसुद्धा वापरून शिणलेला आहे. काही धूर्त लोकांचा 'प्रसिद्धिपराङ्मुखता' हाच मुळी प्रसिद्धिचा एक पवित्रा असतो. अत्यंत मूकपणे परंतु सातत्याने आपले कार्य करीत राहणे आणि त्यामुळे या ना त्या प्रमाणात उपेक्षित राहणे हेच काहींच्या वाट्याला येते.

६) काही जणांशी आपली बऱ्यापैकी ओळख असली तरीही आपण चार चौघांत ओळख सांगणे टाळतो. तर काही जणांशी अगदी तोंडओळख असली तरीही 'आम्ही एका ताटात जेवलो होतो' असं सांगून मोकळं होतो. 'तोंडओळख' असलेल्यांची 'ताट ओळख' सांगण्याचा कधी कधी अगदी राग येतो. पण आपला नाईलाज असतो. कारण आपण ज्यांची हक्काने ओळख सांगत असतो त्या व्यक्तीच इतक्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या असतात की आपल्याला त्यांच्याविषयी आपलेपणा वाटत असतो.

७) मधमाशांना जोवर कोणी डिवचत नाही तोवर त्या निरुपद्रवी असतात. मधाच्या पोवळ्याला चिकटून या मधुमक्षिका निर्भयतेने मधुपान करीत त्याचा आस्वाद घेत कणाकणाने मधाची पोळी पिकवत असतात. परंतु वरकरणी निरुपद्रवी वाटणाऱ्या या मधुमक्षिकांना जर कोणी डिवचले तर त्यांचे मोहोळ उठते आणि डिवचणाऱ्याच्या अंगाचा दाह होईल आणि प्राण कंठाशी येईल एवढा जबरदस्त हल्ला त्या त्यांच्या तडाक्यात सापडणाऱ्यांवर करतात.

✦✦✦

# सद्भक्तांना आवाहन

इ.स. १९२२ सालातील विजया दशमीच्या सुमुहूर्तावर प.पु. श्रीभाईंनी (श्री रामचंद्र शंकर टाकी, अर्थात श्री टाकी महाराज, २रे) सद्भक्ती प्रसारक मंडळी ह्या न्यासाची (ट्रस्ट) स्थापना केली. दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी, म्हणजे ह्या वर्षीच्या विजयादशमीस ह्या संस्थेला ९९ वर्षे पूर्ण होऊन शंभराव्या वर्षात पदार्पण केले आहे. ह्या ९९ वर्षातील संस्थेची यशस्वी वाटचाल केवळ श्रीगुरुकृपेमुळे आहे ह्याची जाणीव सर्व विश्वस्तांना आहे आणि श्रीगुरुंची अशीच अखंड कृपादृष्टी सद्भक्ती मंदिरावर आणि समस्त भक्तजनांवर राहो, अशी त्यांचे चरणी प्रार्थना आहे.

सद्भक्ती मंदिर ही वास्तू प.पु. श्रीभाईंनी इ.स. १९२३ साली बांधली. पुढील वर्षीच्या विजया दशमीच्या दिवशी, म्हणजे दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी, सद्भक्ती मंदिर शंभराव्या वर्षात पदार्पण करेल. त्या निमित्ताने ह्या दिवसापासून पुढील वर्षभर, अर्थात इ.स. २०२३च्या विजया दशमीपर्यंत शताब्दी वर्ष साजरे करण्याची प्रेरणा श्रीगुरुंनी दिली आहे. त्या निमित्ताने वर्षभर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम करण्याचे योजिले आहे. श्रीगुरुंचीच प्रेरणा असल्यामुळे शताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्यास त्यांचेच मार्गदर्शन लाभून सर्व कार्यक्रम यशस्वी होतील अशी खात्री आहे.

शताब्दी वर्ष साजरे करण्यासंबंधी विश्वस्त मंडळी नियोजन करीत आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमात गायन, वादन, नर्तन इत्यादी सादर करण्याकरिता देशभरातील नामवंत कलाकारांना पाचारण करण्याविषयी विचार विनिमय चालू आहे. सामाजिक उपक्रमात, श्रीभगवद्गीता, श्रीरामरक्षा आणि श्रीहनुमानचालीसा ह्यांचे शालेय विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेऊन एक स्पर्धा आयोजित केली जाईल. विजेत्यांना श्री टाकी महाराजांच्या नावे योग्य ती पारितोषिके दिली जातील. जे विजेते नाहीत पण ज्यांनी स्पर्धेत भाग घेतला आहे अशा स्पर्धकांना उत्तेजनार्थ सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे स्मृतिचिन्हे दिली जातील.

सद्भक्ती ग्रंथालय आणि वाचनालय सुरू करण्याचा मंडळींचा मनोदय आहे आणि त्या दिशेने पावले टाकायला सुरूवात झालेली आहे. धार्मिक कार्यक्रमात मुख्यत: महाराष्ट्रातील नावाजलेल्या कीर्तनकारांचे कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील.

शताब्दी वर्षातील प्रायोजित कार्यक्रमांची ही एक ढोबळ रूपरेषा आहे.

प.पु. श्री भाईंचे मराठी, इंग्रजी आणि चक्क लॅटिन ह्या भाषांवर प्रभुत्व होते. पण संस्कृत भाषेकडे ते आकृष्ट होऊन ती भाषा आत्मसात करण्याची त्यांना जबर आस लागली आणि पुढे श्री मंगेशाच्या कृपेने त्यांची त्या काळातील देशातील सर्वोत्तम संस्कृत विद्वान माननीय पंडित श्री फोंडूशास्त्री सुखटणकर ह्यांची गोव्याच्या त्या पवित्र भूमीत गाठ पडून प.पु. श्री भाईंनी संस्कृत भाषेवरदेखील कसे प्रभुत्व मिळविले ह्या विषयीच्या वृत्तांत आपण त्यांच्या चरित्रात वाचलाच आहे. प.पु. श्री भाईंचा संस्कृत भाषेकडे असलेला ओढा लक्षात घेऊन संस्कृत भाषेचा प्रसार होण्याकरिता संस्कृत प्रबोधिनी सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे नियमितपणे आयोजित केल्या जातील.

सद्भक्ति मंदिर या वास्तूला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत म्हटल्यावर ह्या इमारतीत दुरुस्ती, डागडुजी करण्याची नितांत आवश्यकता आहे. बांधकामाच्या संदर्भातील कामे, इलेक्ट्रिकल कामे, प्लाम्बिंग, रंगरंगोटी इत्यादी गोष्टी विचाराधीन आहेत आणि ही सर्व कामे करणे अत्यंत गरजेचे आहे.

ह्या सर्व कार्याकरिता बऱ्यापैकी खर्च होणार ह्याची जाणीव आहे. अंदाजे २५ लाख रुपये इतका खर्च येईल असे अनुमान आहे. ह्या पूर्वीचा अनुभव असा आहे की जेव्हा जेव्हा सद्भक्ती मंदिराकरिता काही आर्थिक गरज उत्पन्न झाल्यास आवश्यक तितका निधी श्रीगुरुकृपेने आपोआपच आणि योग्य वेळी उभा राहात असे. ह्या खेपेस देखीला सद्भक्त सढळ हस्ते मदत करतील अशी आशा नव्हे तर खात्री आहे.

ईश्वरी संकल्प तो स्वत: परमेश्वच पूर्ण करून घेतो. आपण केवळ निमित्तमात्र आहोत. तरी जेव्हा श्रीगुरुंच्या प्रेरणेनेच हा शताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्याचे योजिले आहे. तेव्हा हा ईश्वरी संकल्प पूर्ण करण्याकरिता चहुबाजूंनी मदतीचे हात पुढे येतील ही खात्री आहे.

ओम श्रीगुरुदेवदत्त!

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

# — मंगलाचरण —

**पद**

गाईये गणपती जगवंदन । शंकर सुमन भवानिनंदन।।
सिद्धीसदन गजवदन विनायक । कृपासिंधू सुंदर सबलायक।।१ ।।
मोदकप्रिय मुद मंगलदाता । विद्यावारिधि बुद्धि विधाता।।२ ।।
मागत तुलसीदास कर जोरे । वसहि रामसिय मानस मोरे।।३ ।।

## सर्वात्मभावे वंदन

**(१) श्लोक**

सजयति सिंदुरवदनो देवो यत्पादपंकज स्मरणम्।
वासरमणि: इव तमसां नाशयति विघ्नानाम्।।
अभिदजलयदनिवहं भ्रमरकुनीक सेवित कपोलय्।
अभिमत फळदातारं कामेश गणपती वंदे।।

**(२) श्लोक**

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै: श्री गुरवे नम:।।

**(३) श्लोक**

नारायणं नमस्कृत्यं नर चैव नरोत्तमम्।
देवई सरस्वती व्यासं ततो जयमुदीरयेत्।।
श्रयतां दवेदेवेश नारायण जगत्पते।
त्वदीयनावधानेन कथयिष्ये शुभा: कथा:।।

**(४) श्लोक**

नमोजी गणेशा नमोजी सुरेशा। नमोस्वप्रकाशा नमो विघ्ननाशा।।
तुला वंदिल्याविण कांही करेना। तया प्रत्यवायो कधीहि पडेना (विघ्ननाशा)।।

### (५) श्लोक

श्रीमद्वामन पदापद्मयुगुली अर्पू मना षट्पदा।
स्वात्मा तो अजी सत्पदे स्फुरतसे दावी स्वयेचिवादा।।
आनंदात्मक तो श्रीहरि-गुरु-आत्मा नसे वेगळा।
ऐसा श्री भगवान् तयानमि तसे प्रेमें जगन्मंगल।।

### (६) श्लोक

जगदंबे! चिच्छक्ते जी करून प्रभू चराचरा धरितो।
त्या तुज सरस्वतीते बाळ तुझा नमन प्रीतिने करितो।।
तव सून गौडपाद आणि वसिष्ठादि श्रेष्ठ हरिदास।
त्याच्या चरणरजाते घडू माझे शिरी सदा वास।।

### (७) श्लोक

प्रथम वंदुनि श्रीहरि श्रीपती। नमुं विधि सरसिजोद्भव त्याहती।
अभि दत्त चरणां स्वशिरी धरूं। अयन आश्रय नरांसचि स्मरूं।।

### (८) साकी

नारायण द्वय - राधाकृष्ण - हाती देऊनि हाता।
शंकरसुत - श्रीरामचंद्र प्रभू चरणीं ठेवूं माथा।।
वामन पंडित - रामदास - श्री तुकाराम - श्री नाथा।
कायावाचामनें सेवुनी नमन करूं या संता।।

### (९) आर्या

श्री मांगिरीश वंदुनि वंदू रामेशहि रसेशाळा।
पुरुष प्रभृति नमुनि नमूं प्रेमें देव - भक्त - सकळांला।।

संपादिका : सौ. निर्मला चंद्रशेखर काळे

# शोकवृत्त

प.पु. श्री टाकी महाराजांचे भक्त दूरदूरवर सर्वत्र पसरलेले आहेत. त्यातील इंदूर येथे स्थायिक झालेल्या आमच्या एक ज्येष्ठ गुरुभगिनी सुश्री जयश्री गुप्ते ह्या दि. ७ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता, वयाच्या ७३व्या वर्षी प.पु. श्री दादाभाईंच्या चरणी विलीन झाल्या.

सुश्री जयश्री ह्या इंदूरातील एक थोर श्रीदत्तभक्त आणि महान ज्योतिषी म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या कै. श्री. भालचंद्र गुप्ते ह्यांची कन्या होत. संपूर्ण आयुष्य भगवद्भक्ती करण्याचे भाग्य ज्यांना लाभलेले असते अशा भाग्यवान गुप्ते परिवारात सुश्री जयश्री ह्यांचा जन्म झाला होता. दररोज नित्य पूजापाठ आणि त्या जोडीला आपल्या सद्भक्ती मंदिरातील भगवद्भजन ह्या पुस्तकातील सर्व नित्यसेवा त्या नेमाने करीत असत.

देह ठेवण्यापूर्वी बरेच दिवस त्या आजारी होत्या. त्या काळात देखील नित्यसेवा करण्याकरिता त्या प्रयत्नशील असत. ह्या पवित्र सेवेत त्यांना त्यांच्या बंधूंची, श्री शशिकांत आणि श्री. निशिकांत ह्यांची मोलाची मदत मिळत असे. देह सोडण्याच्या एक दिवस आधी सुश्री जयश्रींनी प्रल्हादबाळ निजसूत छळी तयातें ही प.पू. श्रीभाईंनी रचलेली श्री भगवद्गीतेवरील संक्षिप्त पण बोधयुक्त रचना बंधू श्री शशिकांत यांजकडून ऐकून घेतली. आणि प्रत्यक्ष वैकुंठारोहण करते समयी थोर संतकवी श्री वामन पंडित विरचित समश्लोको-गीता-उपसंहार, ज्यात भगवद्गीतेच्या सर्व अठरा अध्यायांचे सार कथित केले आहे, ते बंधू श्री शशिकांत, यांजकडून ऐकून घेतले. आणि डोळे मिटले. धन्य तो अखेरचा क्षण.

गुप्ते परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

✦✦✦

# शोकवृत्त

आम्हाला कळविण्यास दु:ख होते की आमची ज्येष्ठ बहीण श्रीमती निवेदिता कलावर (पूर्वाश्रमीच्या निवेदिता हळदिपूर) ह्यांचे दि. २९ डिसेंबर, २०२१ रोजी रात्री ९.१२ मिनिटांनी प्रदीर्घ आजाराने, वयाच्या ७५व्या वर्षी पुण्यात निधन झाले. त्यांना मृत्यूची चाहूल लागली होती. म्हणून त्यांनी मृत्यूच्या काही वेळेपूर्वीच सर्व भावंडांना व्हिडिओ कॉल करून हात हलवून शेवटचा निरोप घेतला होता.

त्या सद्भक्ती मंदिरात १९६४ पर्यंत प्रत्येक रविवारी नियमित येत असत. त्यांची श्री भाई व दादाभाईंवर अतिशय श्रद्धा होती. त्यांनी सद्भक्तीच्या बाल मंडळींच्या लळीतामध्ये श्रीकृष्णाची भूमिका अतिशय तन्मयतेने निभावली होती हे जुन्या मंडळींना आठवतच असेल. पुढे तिने श्री रामकृष्ण मठांचे अध्यक्ष स्वामी श्री विरेश्वरानंद (श्री शारदा मांचे दीक्षित शिष्य) यांचे कडून मंत्र दीक्षा घेतली.

त्यांच्या सिंगापूरच्या तथा अमेरिका व पुणे येथील वास्तव्यात देखील त्या श्री रामकृष्ण मिशनमध्ये नियमितपणे जाऊन सेवा करीत असत. त्यांचा आवाज त्यांच्या आई निर्मलाताई हळदीपूरांच्या आवाजासारखा अतिशय गोड होता. त्या भजन व श्लोक ही उत्तम रितीने तल्लीन होऊन गात असत व स्वत:च्या नातवांना शिकवीत. त्यांचे आपल्या सर्व भावंडावर व त्यांच्या नातवंडांवर विशेष प्रेम होतं. गेली ५ वर्षे त्या कोलोन कॅन्सरच्या रोगाने ग्रासल्या असताना देखील, त्या तीव्र दुखण्याला आपल्या प्रारब्धाचे अटळ भोग समजून श्री रामकृष्ण परमहंस व श्री भाईंच्या शिकवणी प्रमाणे अतिशय आनंदाने भोगत आल्या. आता आम्ही ह्या नि:स्वार्थी प्रेमाला मुकलो.

श्री रामकृष्ण परमहंस व श्री भाई दादाभाईंच्या कृपेने तिला त्यांच्या चरणी अखंड वास लाभला असेल ह्यात संदेहच नाही.

(**ता.क. :-** श्रीमती निवेदिता हळदीपूर ह्या श्री निजानंद हळदीपूर आणि दिवगंत कीर्तीचे सुप्रसिद्ध बासरीवादक श्री नित्यानंद हळदीपूर ह्यांच्या भगिनी होत. ह्या बंधूंकडून वरील शोकवृत्त प्राप्त झाले आहे. आम्ही दोन्ही हळदीपूर बंधूंचे आभारी आहोत.)

✦✦✦